

# आर्थिक धोरण

मानवी जीवनात वेळेला खूप महत्त्व आहे. जीवनात आलेल्या प्रत्येक क्षण जाणून घेऊन, त्याचं महत्त्व ओळखून, त्याची उपयुक्तता जाणून घेऊन त्याचा जर आपण योग्य उपयोग करून घेऊ शकलो, तर तो क्षण सार्थकी लागला असं म्हणता येईल. अन्यथा तो क्षण वाया गेला असंच म्हणावं लागेल. आर्थिक नियोजन मग ते कुटुंबाचं असले, समाजाचे असेल किंवा देशाचं असेल त्यामध्ये वेळ हा एक खूप महत्त्वाचा घटक आहे, पैलू आहे. व्यक्तीच्या जीवनात तीन शक्ती प्रमुख आहे. आध्यात्मिक शक्ती, शारीरिक शक्ती आणि मानसिक शक्ती. या शक्तींचा उपयोग त्या त्या क्षणानुसार, त्या त्या वेळेनुसार केला पाहिजे तरच या शक्ती लाभदायक ठरतात. या विषयाच्या निमित्ताने एक छोटासा अट्टाहास मी करत आहे. याचं कारण जे आपल्याला समजलं आहे, ते लोकांना सांगितलं पाहिजे, असं मी मानतो. आपले विचार जर गर्भातच मरून गेले किंवा ते बाहेर प्रकट न होताच नाहीसे झाले तर ते मूर्त रूपात येऊ शकत नाहीत; ते वाया जातात. असं झालं तर त्यात आपलाच दोष असतो. व्यक्तीचं, समाजाचं आणि देशाचं आर्थिक धोरण कसं असावं, याबद्दल माझ्यापरीने केलेला विचार मी आपल्यापुढे ठेवत आहे.

वर उल्लेख केलेल्या ज्या तीन गोष्टी आहेत त्यांचा सुयोग्य, व्यवस्थित उपयोग केला गेला नाही तर त्यांचा ऱ्हास होतो. हा ऱ्हास कायमस्वरूपी होतो. त्या परत येऊ शकत नाहीत. व्यक्तीच्या, समाजाच्या आणि देशाच्याही जीवनात आणखी एक अशीच गोष्ट आहे. ती म्हणजे, 'पैसा'. आजच्या काळात या पैशाचं महत्त्व वेगळं

सांगायला नको. पैसा हा अर्थकारणाचा गाभा आहे. अर्थकारणाचं ते एक प्रमुख साधन आहे. 'जग पैशांभोवती फिरतं' असं जेव्हा म्हटलं जातं तेव्हा जगाच्या अर्थकारणात पैशाचं महत्त्व किती आहे, हेच अधोरेखित होतं. पैसा योग्य वेळी, योग्य ठिकाणी खर्च झाला तर त्याचा परिणाम चांगला होऊ शकतो. पैसा घर अयोग्य वेळी, अयोग्य ठिकाणी खर्च केला गेला तर मात्र त्याचा परिणाम दिसत नाही आणि पैसा तर वाया गेलेला असतो. एखादी गोष्ट आपण योग्य वेळी केली नाही याची खंत बऱ्याचदा आपल्या मनात राहते. उदाहरणार्थ, घर विकत घ्यायचं आहे, पण घर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यास उशीर झाला आहे. आता बिल्डरकडे बुकिंग संपलं आहे आणि बाजारात घराच्या किंमती वाढल्या आहेत, आपल्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. आता आपण मनासारखं घर घेऊ शकत नाही आहोत. घर घेण्याचा निर्णय करण्यास झालेल्या उशिराची खंत पुढे आपल्याला आयुष्यभर त्रास देऊ शकते. अशी अनेक आर्थिक गणितं आपण योग्यवेळी सोडवली नाही तर त्याचा आपल्याला तोटा होऊ शकतो.

योग्य वेळी, योग्य ठिकाणी पैसा खर्च करणं यासाठी मनुष्याकडे विवेक आवश्यक आहे. मनुष्याने विवेकीपणाने वागायला हवं. अतिहव्यास हा वाईट असतो. आपल्या मोहाला आपण विवेकाचा लगाम घालायला हवा. शेअर मार्केट हा सुद्धा एक प्रकारचा जुगारच आहे. इथे पैसे गुंतवायचे असतील तर व्यवस्थित माहिती घेऊन, अभ्यास करून गुंतवले पाहिजेत. उदाहरणार्थ, एखादा शेअर तेजीत आहे म्हणून तो खरेदी केला, पण ही तेजी चार दिवस टिकली आणि आता त्या शेअरच्या मूल्याची घसरण सुरू झाली तर आज गुंतवलेले पैसे काढून घेणं म्हणजे नुकसान सोसणं आहे; कारण तुम्ही ज्या दराने शेअर विकत घेतले त्यापेक्षा कमी दराने ते तुम्हाला विकावे लागणार आहेत. म्हणजे तोटा होणं अटळ आहे. एखादा शेअर तेजीत आहे म्हणून तो खरेदी करण्यापेक्षा तो शेअर तेजीत का आहे, याआधी तो कधी तेजीत होता, त्यावेळी काय घडलं अशा वेगवेगळ्या गोष्टी जाणून घेणं आवश्यक आहे. एखाद्या कंपनीला तात्पुरता फायदा झाला असेल पण ती दीर्घकाळापासून तोट्यात असेल तर तिच्या शेअरच्या मूल्यात झालेली वृद्धी किती काळ टिकू शकते, याची माहिती तज्ज्ञांकडून घेतली पाहिजे. अर्थात, आधी म्हटल्याप्रमाणे हा एक जुगार आहे. इथे अंदाजावर, ठोकताळ्यांवर व्यवहार केले जातात, त्यामुळे इथे पाऊल जपूनच टाकलं पाहिजे. लोक सोने-चांदी खरेदी करतात. सोन्या-चांदीत पैसे गुंतवतात.

सोन्या-चांदीचे भाव तेजीत असताना ते विकले तर त्यातून आर्थिक नफा मिळतो, पण त्यांच्या भावात मंदीसुद्धा येऊ शकते. तेजी-मंदीचा हा खेळ जोखमीचा असतो. म्हणूनच यासाठी आर्थिक नियोजन आवश्यक असतं. कोणी एखादा श्रीमंत झाला की कोणीतरी एखादा गरीब होतो हे आपण समजून घेतलं पाहिजे. एखाद्याचं आय (उत्पन्न) हा एखाद्याचा व्यय (खर्च) असतो. आय-व्यय या व्यवहारातील समतोल महत्त्वाचा असतो व त्यासाठीच आर्थिक धोरण आवश्यक ठरतं, मग ते व्यक्तीचं असेल, कुटुंबाचं असेल किंवा देशाचं असेल.



आइन्स्टाइनने ऊर्जेचं सूत्र सांगितलं आहे, $E= mc^2$. ही ऊर्जा म्हणजे शक्ती एकच आहे. फक्त तिची रूपं वेगवेगळी असू शकतात. तिचं एका रूपातून दुसऱ्या रूपांत परिवर्तन घडू शकतं. उदाहरणार्थ- धरणामध्ये पाण्याच्या रूपात जी स्थिर ऊर्जा आहे तिचं रूपांतर विद्युतशक्तीत होतं. हीचा वीज जेव्हा पंखा फिरवते तेव्हा हवेला गती मिळते, हीच वीज जेव्हा ट्युबलाइटमध्ये जाते तेव्हा प्रकाश पसरतो, हीच वीज हिटरमध्ये जाते तेव्हा उष्णता मिळते. हवा, प्रकाश, उष्णता या देखील शक्ती आहेत, ऊर्जा आहेत म्हणजेच ऊर्जा एक आहे. त्याचप्रमाणे या जगात पैसा देखील एकच आहेत. पैसा हे शक्तीचंच एक रूप आहे. म्हणूनच पैशाचं नियोजन होताना इतक्या बारकाईने ते केले गेले पाहिजे की त्याचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी जास्तीत जास्त झाला पाहिजे.

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय तो राहू शकत नाही. समाजाशिवाय त्याचा विकास होऊ शकत नाही. माणसाच्या भल्यासाठी समाजाचे काही अलिखित नियम आहेत, उदाहरणार्थ, माणसाने साधं राहावं, गरजेपुरतं घ्यावं, जास्त हव्यास करू नये, जास्त महाग लाड करू नयेत, परोपकार करावा, लोकांचं भलं चिंतावं, कोणाला लुबाडू नये, परधनावर डोळा ठेवू नये. समाजाचे हे अलिखित नियम बऱ्याच प्रमाणात 'अर्थ' किंवा पैशांशी निगडित होते. यामधून समाजाचं आर्थिक धोरण प्रतीत होतं. एखादा माणूस श्रीमंत असेल, श्रीमंत असल्यामुळे त्याला



काही हौस-मौज करता येत असेल, त्यात तो खूश असायचा पण अशी हौस-मौज करता येत नाही म्हणून गरीबसुद्धा दुःखी नसायचा. त्याच्या मर्यादेत तो खूश राहायचा. श्रीमंताच्या गरजा वेगळ्या, गरीबांच्या वेगळ्या, त्याचा आनंद वेगळा याचा आनंद वेगळा. प्रत्येकजण आपापल्या स्तरावर समाधानी असणं हे समतोल आर्थिक धोरणाचं एक लक्षण म्हटलं पाहिजे.

या सगळ्यात आज मोठा बदल काय झाला असेल तर आपण अर्थ-कारणामध्ये उछाल करतो आहोत. उछाल म्हणजे लाट, भरती. आपण अशा लाटा निर्माण करतो. त्यामुळे एखाद्या उद्योगाला भरती येते. उदाहरणार्थ, अमुक एखादं नवं प्रॉडक्ट बाजारात येतं, त्याची वेगवेगळ्या पद्धतीने खूप जाहिरातबाजी केली जाते, त्यामुळे त्या प्रॉडक्टची लाट तयार होते, त्या प्रॉडक्टला भरती येते, त्याचवेळी दुसऱ्या कुठल्यातरी प्रॉडक्टला ओहोटी लागते, त्याची लाट ओसरू लागते. भरती येते, त्याच्या पाठोपाठ आहोटी येतेच. भरती-ओहोटीच्या या खेळात टिकाव धरताना लोकांची दमछाक होऊ लागली आहे. लोक हैराण होऊ लागले आहेत. लोक असुरक्षित होऊ लागले आहेत. परिणामी ज्यांच्याकडे आहे ते अधिक मिळवण्याचा प्रयत्न करू लागले आहेत आणि ज्यांच्याकडे नाही ते त्यांना मिळालंच पाहिजे, या भावनेतून साम-दंड-भेदभाव सारं वापरून मागे लागले आहेत. ही जी मानसिकता तयार झाली आहे, ती प्रथम बदलली पाहिजे. ज्याचा त्याला आनंद घेऊ द्या.

आज कोणी टाटा असेल, बिर्ला असेल किंवा कोणी अंबानी असेल तर त्यालाही फ्लॉवरची भाजी खायची इच्छा होत असेल. गरीब असो की श्रीमंत, साऱ्यांसाठी फ्लॉवर एकच आहे. गरिबाने केलेली फ्लॉवरची भाजी श्रीमंताने केलेल्या फ्लॉवरच्या भाजीपेक्षा फार वेगळी असणार नाही. फार फार तर मसाल्यात काही फरक असेल, बनवण्याच्या पद्धतीत काही फरक असेल पण त्यामुळे फ्लॉवरच्या मूळ चवीत फार मोठा फरक पडत नाही. त्यामुळे दृष्टिकोन बदलला पाहिजे. माणसाने काय करायचं, काय नाही करायचं हा एक आर्थिक बाबीशी, आर्थिक धोरणाशी निगडित

विचार आहे. हे जरी खरं असलं तरी आजकाल माणसावर अनेक गोष्टी लादल्या जातात. उदाहरणार्थ, तुला इतके मार्क्स पडले पाहिजेत, तुला इतके पर्सेंटेज मिळाले पाहिजे, तू डॉक्टर झाला पाहिजेस, तू इंजिनियर झाला पाहिजेस, वगैरे. काहीही करून तुला पैसे कमावले पाहिजेत, पैसे कमावल्याशिवाय तुझ्या ज्ञानाचा, कौशल्याचा, ताकदीचा काहीही उपयोग नाही, हे त्याच्या मनावर बिंबवलं जात आहे. हे खरं आहे की, पैसा असेल तर तुम्ही बंगला घेऊ शकता, नोकर चाकर ठेवू शकता, गाडी घेऊ शकता, तुम्हाला हवं ते तुम्ही करू शकता, जरी तुम्हाला ते करायचं नसलं तरी, तुम्ही फॉरेनला जाऊ शकता, कोठेही फिरायला जाऊ शकता, पण पैशांनेच सारं काही विकत मिळत नाही, हेही तितकंच खरं आहे; माया, प्रेम, आपलेपणा, शांती या गोष्टी मिळवण्यासाठी पैशांपेक्षा आपल्या आतला माणूस जागा असण्याची जास्त आवश्यकता असते.

आर्थिक धोरण ठरवताना असा विचार केला गेला पाहिजे की, आधी ज्याचा उल्लेख केला त्या भरती-ओहोटीच्या लाटा नियंत्रित झाल्या पाहिजेत. त्यांचं प्रमाण कमी झालं पाहिजे. लोकांना फसवण्याच्या धंद्याला आळा बसला पाहिजे. आज खोटी आमिषं दाखवून लोकांना लुबाडलं जातं. उदाहरणार्थ, दोन वर्षांत रक्कम दुप्पट करून देण्याचं किंवा भरमसाठ व्याज देण्याचं आमिष दाखवलं जातं. लोक या मोहाला बळी पडतात व बहुसंख्य लोक मोठ्या रकमांची गुंतवणूक करतात. मग एक दिवस या गुंतवणूक कंपन्यांना टाळं लागतं, त्यांचे संचालक सगळा पैसा घेऊन पोबारा करतात. लोकांच्या कष्टाने कमवलेला पैसा दिवसाढवळ्या लुटला जातो. अलीकडेच पश्चिम बंगालमधील एक चिटफंडाचं उदाहरण समोर आलं आहे. बंगालमधील गोरगरिबांनी आपल्या कष्टाची पै पै जोडून विश्वासाने या फंडात गुंतवली. फसवणूक झाल्याचं या गरिबांच्या लक्षात आलं तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. कोणी आईच्या ऑपरेशनसाठी पैसे जमवले होते, कोणी मुलीच्या लग्नासाठी. अनेकांनी आत्महत्या केल्या. मुळात लोकांची अशी दैना करणारा धंदा करण्याची गरजचं काय आहे? अशा गैरधंद्यांना कठोरपणे आळा घातला पाहिजे. लोकांना लालूच दाखवण्याच्या अशा प्रकारच्या गोष्टींची निर्मितीच समाजात होता कामा नये.

माणसाला मोह होतो. त्याच्यात लालसा निर्माण होते. लॉटरी, मटका, जुगार, जादा व्याजाचं, ज्यादा परताव्याचं आमिष ही सारी प्रलोभनं आहेत, जी माणसाला मोहात पाडतात. आजकाल लोकांना इझी मनी हवा आहे. मला काहीतरी कमवायचंय, पण त्यासाठी माझी कष्ट करण्याची तयारी नाही, परिश्रम घेण्याची तयारी नाही. पैसा

मिळवण्याचा शॉर्टकट मला पाहिजे आहे. आज आपल्या समाजात हा लालचीपणा वेगवेगळ्या माध्यमातून समोर येत आहे. उफाळून येत आहे. बेकायदा इमारती बांधायच्या, लोकांच्या, अज्ञानाचा फायदा घेऊन दामदुप्पट दराने घरं विकायची आणि मग एक दिवस कच्चं बांधकाम उघडं पडतं. इमारत ढासळते. अनेक संसार धुळीला मिळतात. बिल्डरची मात्र चांदी झालेली असते. समाजातला हा लालचीपणा निपटून काढला पाहिजे.

आर्थिक धोरणाच्या बाबतीत एक साधा नियम सर्रास वापरला जातो. तो म्हणजे, ज्यांचं उत्पन्न जास्त आहे, ज्यांच्याकडे खूप मालमत्ता आहे, त्यांना जास्त कर (टॅक्स) लावला पाहिजे, आणि ज्यांचं उत्पन्न कमी आहे, ज्यांच्याकडे मालमत्ता कमी आहे. त्यांना कमी कर लावला पाहिजे. हे योग्य आहे, परंतु या दोन वर्गांकरता कराच्या दरामधलं फरक फार मोठा असू नये. त्यातील अंतर कमी असावं. उदाहरणार्थ, गरिबांना जर अर्धा टक्का दर असेल तर श्रीमंताला तो एक टक्का असायला हरकत नाही पण तो दहा-वीस टक्क्यांएवढा मोठा असू नये. या शिवाय कराची संपूर्ण वसुली प्रामाणिकपणे केली गेली पाहिजे, त्यामध्ये भ्रष्टाचार होता कामा नये. तरच शासनाच्या तिजोरीत पैसा जमा होऊ शकेल व सरकारला लोकांसाठी उपयुक्त कामं करता येतील. कराच्या दरांमधील फरक कमी असेल तर करदाते कराच्या चुकवेगिरीचा प्रयत्न करणार नाहीत. कराची चोरी पकडली जाऊ नये म्हणून लाच दिली-घेतली जाते. भ्रष्टाचार होतो. लोक प्रामाणिकपणे कर भरू लागले तर या भ्रष्टाचाराचं प्रमाण खूप कमी होऊ शकतं.

कराच्या आकारणीबाबत माझ्या मनात एक संकल्पना आहे. ती मी आपल्यासमोर ठेऊ इच्छितो. माणसाने आयुष्यात किती कमवावं यावर काही बंधन नसलं तरी चालेल, पण तो जे काही कमवेल ते त्याच्या नावाने कमवेल. आयुष्यभरात त्याने जमवलेली सर्व संपत्ती तो मरेपर्यंत फक्त त्याच्याच नावावर राहील, आयुष्यात तो जे काही करू इच्छितो, ते तो त्याच्या नावावर करू शकतो. त्यावर कोणत्याही प्रकारचा कर लागणार नाही. मात्र, त्याला त्याने कमवलेला पैसाअडका, संपत्ती सरसकट त्यांच्या मुलाच्या नावाने किंवा नातेवाइकांच्या नावाने करता येणार नाही. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीचा ५० टक्के भाग म्हणजे अर्धा हिस्सा सरकारजमा होईल व उर्वरित अर्धा हिस्सा त्याच्या मुलांना-नातेवाइकांना मिळेल. या हिश्शाच्या वाटपाविषयी तो मृत्यूपत्र करू शकेल. याचा परिणाम काय असेल? एकतर माणसाला

त्याच्या आयुष्यभरात कराचा जाच होणार नाही, वेगवेगळ्या करांची, कायद्यांची झंझट त्याच्या मागे राहणार नाही. तो त्याच्या जीवनभरात मुक्तपणे कमाई करू शकेल व आपण कमावलेल्या पैशांचा संपत्तीचा तो कोणत्याही चिंतेशिवाय उपभोग घेऊ शकेल. त्याच्या मृत्यूपश्चात सरकारजमा होणारी त्याची अर्धी संपत्ती हा त्याच्या जीवनभराचा कर असेल. तो त्याला केवळ एकदाच भरावा लागेल, तोही त्याच्या मृत्यूनंतर. इथे मी त्याच्या संपत्तीचा अर्धा हिस्सा किंवा ५० टक्के भाग म्हणतो आहे, तो तेवढाच असला पाहिजे, असं नाही. हा हिस्सा सर्वानुमते, विचारपूर्वक ठरवता येईल. तो २५ टक्के असू शकतो, ४० टक्के असू शकतो किंवा कितीही असू शकतो. माझ्या मते, हे तत्त्व लागू केलं पाहिजे, त्याचा दर व इतर नियम या तांत्रिक गोष्टी असतील.

दुसरं म्हणजे, व्यक्तीच्या कमाईचा जो हिस्सा त्याच्या वारसदाराला मिळेल, त्याबद्दल त्या वारसदाराला त्या हिश्श्यांची काही रक्कम सरकारकडे जमा करावी लागेल. उदाहरणार्थ, माझ्या वडलांचं घर वारसाहक्काने माझ्याकडे येईल, तेव्हा ते माझ्या नावावर होईल. माझ्या वडिलांच्या हयातीत त्यांची इच्छा असली तरी ते माझ्या नावावर होणार नाही. या घराची किंमत जर १० लाख रुपये असेल, तर मला त्याच्या पन्नास टक्के म्हणजे ५ लाख रुपये सरकारला द्यावे लागतील. माझ्या आयुष्यभरात मात्र केवळ एवढाच कर एकदाच भरावा लागेल. पाच लाख रुपयांची ही रक्कम मला हप्त्याने भरण्याची सोय मिळू शकेल. माझ्या जीवनभरात मी कमावलेल्या मालमत्तेचा वाटा माझ्या मृत्यूपश्चात सरकार जमा होईल, माझ्या हयातीत नाही; म्हणजेच, माझ्या स्वत:च्या कमाईवर मला माझ्या आयुष्यात कर द्यावा लागणार नाही. मात्र, वारसा रूपाने, बक्षीस रूपाने जर काही संपत्ती मला मिळाली तर तिचा हिस्सा मला सरकारला द्यावा लागेल. यामध्ये कोणाही व्यक्तीला त्याच्या हयातीत त्याची संपत्ती कोणालाही दान करता येणार नाही, अशीही तरतूद करता येईल.

या करप्रणालीचा तुम्ही विचार करून पाहा. आज वेगवेगळ्या प्रकारच्या करांच्या वसुलीसाठी किती मोठ्या प्रमाणावर यंत्रणा लागते, किती वेगवेगळ्या प्रकारचे फॉर्म भरावे लागतात, कर पडताळणी - कर आकारणीसाठी ऑडिटची व्यवस्था लागते, कर चुकवेगिरीच्या पळवाटा शोधण्याच्या कामासाठी किती तज्ज्ञांची फौज बाळगली जाते, हे लक्षात घेतले तर सरकारच्या तिजोरीत कररूपाने किती पैसा येतो, किती पैशांची गळती होते, याचा काहीही अंदाज लावता येत नाही. काळा पैसा

म्हणजे कर चुकवलेला पैसा. या पैशांची समांतर अर्थव्यवस्था चालते. बहुतेकदा या पैशांवर बेकायदा धंदे चालतात, देशातला पैसा परदेशात स्वीस बँकेत जातो. वर उल्लेखित करप्रणाली अंमलात आणायची असं आपण ठरवलं, तर गैरमार्गाला जाणाऱ्या या पैशाला आळा घालता येईल. करप्रणाली सोपी व सुटसुटीत होईल. माणसाला कराचा जाच होणार नाही, असे अनेक फायदे सांगता येतील.

ही झाली एक बाजू जमेची. दुसरी बाजू खर्चाची आहे. आर्थिक धोरणातून शासनाच्या तिजोरीत जमा होणारा पैसा हा कोणत्याही परिस्थितीत सामाजिक दृष्टिकोनातून खर्च केला गेला पहिजे. हा पैसा सामाजिक कामांसाठी खर्च होताना त्यामध्ये गळती होता कामा नये. कोणाचेही स्वार्थ यामध्ये येता कामा नयेत. याकरिता या पैशांची जबाबदारी व उत्तरदायित्व निश्चित केले गेलं पाहिजे. 'तळं राखेल तो पाणी चाखेल' असं म्हटलं जातं. पणा इथे अशाप्रकारे 'पाणी चाखण्याची' सोयच राहणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. यात कोणी अफरातफर केली, मधल्यामधे पैसा हडप केला तर त्याला कठोर शासन झालं पाहिजे.

आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्या देशावर असलेलं कर्ज. आज आपण म्हणतो, की या देशात जेव्हा मूल जन्माला येतं तेव्हा त्याच्या डोक्यावर २५ ते ३० हजार रुपये कर्ज असतं. हा झाला देशावर असलेल्या कर्जाचा दरडोई हिशोब. हे कर्ज कधी फिटणार आणि कसं फिटणार? याचा एक मार्ग लोकांना भावनिक आवाहन करणं हा आहे. आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळीकरिता भावनिक आवाहनाचा मार्ग अवलंबला. लोकांकडून त्यांनी दान स्वरूपात जमीन घेतली व ज्या लोकांना गरज आहे पण ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांना ती देण्यात यावी यासाठी सरकारकडे दिली. अशाप्रकारे देशात विषमतेची दरी कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न विनोबाजींनी केला होता. याच पद्धतीने जर शासनाने पैशांच्या वापराविषयी लोकांना भावनिक आवाहन केलं तर त्याचा नक्कीच उपयोग होऊ शकेल. आर्थिक नियोजन करताना शासनाने उत्पादक कामांवर अधिक भर दिला पाहिजे. शासन उत्पादक कामांसाठी ज्या सुविधा उपलब्ध करेल त्यांचा पुरेपूर व योग्य वापर होईल याची दक्षता घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, एखादी जमीन ओलिताखाली आणायची असेल तर पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा योग्य वापर कसा होईल याची खबरदारी त्या पाण्याचा लाभ घेणाऱ्यांवर टाकली पाहिजे. त्यांनी आपल्या जमिनीची प्रत, हवामान, योग्य पिकाची निवड वगैरे गोष्टींचा जीवशास्त्रीय दृष्टिकोनांतून विचार करून पद्धतशीरपणे

उत्पादनात भरघोस वाढ घडवली पाहिजे. अन्यथा पाणी उपलब्ध होऊनही जमिनीचा योग्य वापर केला नाही तर ती खारवट होऊन नापीक बनेल.

आता बात सोन्या-नाण्याची. प्रत्येकाने आपल्या जवळचं सोने-नाणं बँकेत ठेवलं पाहिजे. आपल्याकडे सोन्याला खूप महत्त्व आहे. त्याला धार्मिक महत्त्व देखील आहे. लोकांकडे असलेलं सोनं-चांदी त्यांनी बँकेत ठेवावं यासाठी भावनिक आवाहन करण्यात आलं तर त्याला निश्चित प्रतिसाद मिळेल. लोकांना आपल्या सोन्या-नाण्याच्या सुरक्षिततेची चिंता असते जर त्यांना सुरक्षिततेची आणि गोपनियतेची हमी मिळाली, म्हणजे लोकांनी ठेवलेल्या सोन्या-नाण्याची माहिती गुप्त राखली तर लोक नि:शंक मनाने आपलं हे मौल्यवान धन बँकेत ठेवतील. हे मौल्यवान धन घरात ठेवणं ही सुद्धा जोखीमच असल्याने लोकांना प्रतिसाद मिळेल. परिणामी आज विदेशी कर्जाची परतफेड करताना आपल्या देशाची जी घालमेल होत आहे ती थांबेल.

बँकेत खात्यात ठेवलेल्या पैशांवर कमीतकमी व्याजदर दिला गेला पाहिजे. पैशांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. बँक ही सुरक्षितता ग्राहकांना देत असते ही मोठीच सेवा आहे. त्यामुळे व्याजदर कमीच ठेवले पाहिजे, उदाहरणार्थ २ ते ३ टक्के. बँकेचे जे कर्जदार आहेत लाभार्थी आहेत त्यांना त्यांच्या प्राधान्यानुसार ० टक्क्यांपासून ५ टक्क्यांपर्यंत व्याजदर आकारले पाहिजेत. कर्जावर व्याजाचा दर कमी असल्याने विकासाचा दर वाढू शकेल. ठेवींवरील व्याजदर व कर्जावरील व्याजदर यांच्यातील फरक हा बँकेचा लाभ असून त्यातून बँकेचं कामकाज सुरक्षित चालू शकतं.

आज व्यक्तीला वेगवेगळ्या मार्गांनी उत्पन्न मिळू शकतं. उदाहरणार्थ, माझी नोकरी असते, माझी शेती असते, माझा फ्लॅट असतो. नोकरीतून मला वेतन मिळतं, शेतीतून उत्पन्न मिळतं, फ्लॅटचं भाडं मिळतं वगैरे. आजकाल लोक वेगवेगळ्या बँकांत खाती काढतात. उत्पन्नाच्या वेगवेगळ्या स्रोतांकरिता वेगवेगळं बँक अकाउंट वापरतात. माझ्या मते, उत्पन्नाच्या सर्व स्रोतांमधून मिळणारा पैसा एकाच बँक खात्यात जमा झाला पाहिजे. एका व्यक्तीला अनेक बँकांत खाती उघडण्याची मुभा न देता केवळ तीन ठिकाणी खाती काढण्याची परवानगी द्यायला हवी. त्यापैकी एक खाते नॅशनलाइज्ड बँकेत असेल, एक सहकारी बँकेत असेल आणि एक सहकारी पतसंस्थेत असेल. उरलेली सर्व खाती व्यक्तीला बंद करावी लागतील. त्यामुळे अनेक बँकांमध्ये ठेवलेल्या पैशांची देखभाल घेण्याचा त्रास वाचेल, वेगवेगळ्या बँकांची वेगवेगळी कार्ड बाळगण्यापासून सुटका होईल. बँकांवरचा भार कमी होईल व व्यक्तीची सत्य

आर्थिक परिस्थितीची माहिती समजू शकेल.

माझ्या मते, दैनंदिन व्यवहारात रोख पैशांचा वापर कमी झाला पाहिजे. आजकाल डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड या सुविधा बँकांनी उपलब्ध केल्या आहेत. लोकांनी त्यांचा वापर केल्यास रोख पैसा बाजारात दिसण्याचं प्रमाण खूप कमी होईल. घरकाम करणारे नोकर असतील किंवा मुलांची दररोज शाळेतून ने-आण करणारे रिक्षाचालक असतील त्यांचा पगार किंवा मासिक भाडं हे चेकद्वारेच दिलं गेलं पाहिजे. रोख पैसे न देण्याच्या सूचना ग्राहकांना दिल्या पाहिजेत. अशाप्रकारे सर्व व्यवहार बँकांच्या माध्यमातून झाले तर देशात आर्थिक शिस्त निर्माण होईल, जिचा आज पूर्ण अभाव आहे.

देशाच्या आर्थिक विकासासाठी या काही गोष्टी उपयुक्त ठरू शकतात. त्यावर आणखी विचार झाला पाहिजे. करप्रणाली सुटसुटीत करणं, पैशांचा जास्तीत जास्त उत्पादक वापर करणं, सोनं-नाणं बँकांमध्ये ठेवणं, ठेव आणि कर्जाच्या व्याजदरांमध्ये कपात करणं, व्यवहारासाठी बँकेचा वापर करणं, रोख पैशांचा कमीतकमी वापर करणे हे असे काही उपाय आहेत. त्यामुळे आर्थिक व्यवहार सुरक्षित, सुव्यवस्थित व काटेकोर होऊ शकतील.